प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

सातारा सोमवार । १८ ऑक्टोबर २०२१ । वर्ष ८३ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अह

## बीसीए कॉलेजमध्ये लसीकरण मोहीम

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन फॉर वुमेन आणि कन्याशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत लसीकरणाचे आयोजन करण्यात आले होते.

लसीकरण कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व नागरिकांनी प्रतिसाद दिला. लसीकरण मोहिमेवेळी शाळा समितीचे अध्यक्ष दत्ताजी थोरात, प्राचार्या डॉ. समिक्षा निकम, मुख्याध्यापिका सौ. कविता जगताप, शिवदे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कल्याणी बारटक्के, प्रा. राजश्री निकम, योगिता जाधव उपस्थित होत्या.

Pinke
19/10/21

। सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध
f SakalNews

सकाळ

• सातारा, सोमवार, १८ ऑक्टोबर २०२१

## बीसीए कॉलेजमध्ये लसीकरणास प्रतिसाद

सातारा : येथील बीसीए कॉलेजमध्ये कन्याशाळा व बीसीए कॉलेजच्या वतीने शहरातील अल्पउत्पन्न गटातील नागरिक, विद्यार्थी, पालकांसाठी आयोजित केलेल्या कोव्हिशिल्ड लसीकरण मोहिमेस नागरिकांचा प्रतिसाद मिळाल्याची माहिती प्राचार्या डॉ. समीक्षा निकम यांनी दिली. शिबिराचे उद्घाटन शाळा समितीचे अध्यक्ष दत्ताजी थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी मुख्याध्यापिका कविता जगताप, श्री. शिवदे, डॉ. कल्याणी बारटक्के, प्रा. राजश्री निकम, योगीता जाधव, शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते.

Quibe
19/10/21

शुक्रवार १०/०९/२०२१ अंक ३१४ ४ ₹ पाने ८

# ऐक्य

भाद्रपद शु. ४ शके १९४३ नक्षत्र चित्रा श्रीगणेश चतुर्थी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूर्योदय – ०६:२२:२४<br>सूर्यास्त – ०६:३९:१९ | उद्या अग्निहोत्र वेळ<br>सातारा | सूर्योदय–०६:२२:३२<br>सूर्यास्त–०६:३८:२९ | चंद्रोदय – ०९:१७:४५<br>चंद्रास्त – ०९:१७:१८ | दिवस<br>रात्रीचे |


## बीसीए कॉलेजच्या महिलांचे माणदेशी फौंडेशनच्या माध्यमातून लसीकरण

▲ सातारा, दि.९ : महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन फॉर वुमेन, सातारा कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी माणदेशी महिला सहकारी बँक व माणदेशी फौंडेशन, म्हसवड शाखा यांच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थिनी, स्टाफ व काही स्त्री पालकांचे कोविशिल्ड लसीकरण करण्यात आले. यासाठी शाळा समिती अध्यक्ष, चेअरमन दत्ताजी थोरात, प्राचार्या व आजन्म सेविका डॉ. समीक्षा निकम, माणदेशी फौंडेशन शाखा साताराच्या को ऑर्डिनेटर अपर्णा सावंत यांचे मार्गदर्शन लाभले.